**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५५व्या तर देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२०व्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- स्वच्छ भारत अभियानाची दशकपूर्ती सर्वत्र साजरी

- जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी तिसऱ्या टप्प्यात  ६९ पूर्णांक ६५ शतांश टक्के इतकं विक्रमी मतदान

- आयएसएसएफ नेमबाजी स्पर्धेत १० सुवर्णपदकांसह १४ पदकं मिळवून भारत अग्रस्थानी

**आणि**

- पुण्यात बावधन इथं हेलिकॉप्टर दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देश आज त्यांना आदरांजली वाहत आहे. महात्मा गांधी यांची आज १५५ वी जयंती असून त्यानिमित्त देशासह परदेशातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय मंत्र्यांनी नवी दिल्लीतल्या महात्मा गांधींच्या राजघाट इथल्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२०व्या जयंतीनिमित्त विजयघाट इथल्या समाधीवर आदरांजली अर्पण केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गांधी जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

सर्व नागरिकांनी सत्य, अहिंसा, प्रेम आणि सचोटी ही मूल्यं आत्मसात करून महात्मा गांधींच्या स्वप्नातला भारत प्रत्यक्षात साकारण्याचा तसंच देश आणि समाजाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प करूया, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे.

सत्य, सद्भावना आणि समानता या मूल्यांचा अंगिकार करणाऱ्या महात्मा गांधींच्या आदर्शांमुळे देशाला कायम प्रेरणा मिळत राहील, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं असून लाल बहादूर शास्त्री यांनी आपलं आयुष्य शेतकरी, सैनिक आणि देशाभिमानासाठी समर्पित केलं, असं म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली आहे. अजित पवार यांनी मंत्रालयात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

गांधी जयंतीनिमित्त देशोदेशीच्या भारतीय दूतावासांमध्ये महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. रियाध मधल्या भारतीय दूतावासानं स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत गेले १५ दिवस राबवलेल्या ‘स्वच्छता ही सेवा अभियानाचा’ समारोप आज झाला. यामध्ये स्वच्छताविषयक अनेक उपक्रम राबवले गेले. एक पेड माँ के नाम या उपक्रमात रियाध मध्ये पंधराशे रोपं लावण्यात आली.

**<><><><><>**

गांधी जयंतीनिमित्त आज सर्वत्र स्वच्छता दिवस साजरा करण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्या निमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसमवेत भाग घेतला. यावेळी

स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत १५ बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे. स्वच्छता पंधरवड्याच्या सांगतेनिमित्त देशभरात विशेष कार्यक्रम होत आहेत. नवी दिल्लीच्या संसदभावन परिसरात आज आयोजित स्वच्छता मोहिमेत लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्यासह अनेक खासदार आणि अधिकारी कर्मचाऱ्यांनी भाग घेतला.

**<><><><><>**

राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीच्या सामग्रीमध्ये ८० लाख टन विलगीकृत कचऱ्याचा वापर करण्यात आला असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज नागपुरात सांगितलं. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महापालिकेतर्फे आयोजित श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते. नागपूर महानगरपालिकेमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाला पुरवलं जातं. पेंच, कोराडी, खापरखेडा या प्रकल्पातल्या राखीव पाण्याचा वापर आता शेतकऱ्यांना सिंचनासाठी होत असल्याची माहितीही गडकरी यांनी दिली. कचऱ्यापासून बायो-सीएनजीची निर्मिती शक्य असून महानगरपालिकेनं आता आपल्या ताफ्यातल्या वाहनांमध्ये अशा इंधनाचा वापर सुरू करावा, अशा सूचनाही गडकरी यांनी यावेळी केल्या.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यातले गौरव शामकुळे आणि त्यांच्या सोबत्यांनी गुजरातमधल्या सोमनाथ मंदिरापासून स्वच्छता मोहिम राबवली त्यांनी सांगितलं…

**होल्ड --- बाईट…गौरव शामकुळे**

**<><><><><>**

देशातल्या १४ पूरग्रस्त राज्यांना केंद्रसरकारने पाच हजार आठशे पन्नास कोटी रुपयांहून अधिक निधी जारी केला आहे. यामध्ये महाराष्ट्राला एक हजार चारशे ९२ कोटी रुपये, आंध्र प्रदेशला एक हजार कोटी रुपये, गुजरातला ६०० कोटी रुपये आणि तेलंगणाला चारशे सतरा कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी तिसऱ्या टप्प्यातल्या ४० विधानसभा मतदारसंघांमधे एकूण ६९ पूर्णांक ६५ शतांश टक्के इतकं विक्रमी मतदान झालं. याआधी, १८ सप्टेंबरला पहिल्या टप्प्यात ६१ पूर्णांक ३८ शतांश टक्के मतदान झालं होतं तर २५ सप्टेंबरला दुसऱ्या टप्प्यात ५७ टक्के मतदान झालं होतं. हरियाणामध्ये येत्या शनिवारी एकाच टप्प्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांच्या वतीने जोरदार प्रचार सुरू आहे. हरियाणात पलवल इथं भाजपचे ज्येष्ठ नेते आणि  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रचार सभा झाली. तर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल सोनीपत इथं सभा घेतली.
हरियाणा तसंच जम्मूकाश्मीर मधे मतमोजणी येत्या ८ ऑक्टोबरला होणार आहे.

<><><><><>

देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला अधिकाधिक चालना मिळत असून सप्टेंबर महिन्यात इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी एक लाख ५९ हजारच्या वर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी २३ टक्क्यांनी नोंदणी वाढल्याचं केंद्र सरकारच्या आकडेवारीत म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत इलेक्ट्रिक वाहनांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत २० टक्क्यांनी वाढली आहे. तर सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी ८ लाख ९३ हजार इतकी झाली आहे.

<><><><><>

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूचा तपास करण्यासाठी न्यायिक आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालचा हा एक सदस्यीय आयोग या प्रकरणातली पोलिसांची भूमिका, तसंच इतर संबंधित बाबींचा तपास करेल.

**<><><><><>**

इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट फेडरेशनतर्फे आयोजित ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात भारताच्या दिवांशी हिने सुवर्ण पदक पटकावलं. तसंच, भारताच्या तेजस्विनी, दिवांशी आणि विभूती भाटिया यांनी महिलांच्या २५ मीटर पिस्तुल स्पर्धेच्या सांघिक प्रकारात देखील सुवर्ण पदकाची कमाई केली. सध्या या स्पर्धेत भारत १० सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदक अशा १४ पदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

**<><><><><>**

संयुक्त अरब अमिरातीच्या शारजा इथे उद्यापासून आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. ३ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत एकूण दहा संघ सहभागी होतील.

**//<><><><><>//**